Fear has been created by God to exercise caution for safety.It has to be used for positive purposes.If we choose to remain as God has kept us,of course,with efforts to improve life by taking right approach, fear will vanish.

When we remain with God consciousness,having faith in Him and keep positive approach,there would be no bad effect of fear.

## Conclusion

Sincerity, humility and faith in God accompanied by meditation will enable us to achieve peace and happiness. We should also remember that what we give to others comes back to us. Therefore, if we act to spread peace, happiness, bliss and prosperity by giving money to known needy and charity to repay debt to the society we will achieve happiness, bliss and peace.

(Note :- I have drawn on teachings of Paramahansa Yoganada and articles in Tattvaloka issues of Feb and July 2013,to write this article for benefit of the fellow pensioners)

***- S.V.Naik,*** Andheri East, Mumbai 400069.
Cell# 09821127616

*SPECIAL FESTIVAL OFFER,*

**FOR ALL YOUR INTERNATIONAL COURIER NEEDS**

***Universal Courier***

*We bring the universe at your doorstep*

*SINCE 1992*

*IATA CERTIFIED*

***An Organization run by SBI pensioners***

***Mr. J. N. Sethia & Mr. P. W. Kamerkar's next generation***

**Offering wide range of services for worldwide such as Express Courier, Airfreight Door to Door as well as Airport to Airport, Import/ Export custom clearance & free pick-ups from anywhere in Mumbai. Expertise in dealing with Foodstuff & personal effect shipments for worldwide.**

*Specialize for: UK, Dubai, USA, CANADA, and AUSTRALIA & AFRICA.*

***Contact: Mr.Biren Sethia - 9820338233, Mr.Mahesh Kamerkar - 9820316152, Pushpendra Tiwari -9870198118/9321026630 & Kajal - 8879140670***

**Landline: 022 - 26821072/74**

E-mail: sales@ucglobal.com & mahesh.k@ucglobal.com

Website: www.ucglobal.com

***HO:*** *1 & 2 Skylark, Next to Kamgar Kalyan Bhawan, Near BMC office, Azad Road, Andheri East, Mumbai – 400069*

# Identification of Rupees 500 Fake Notes:
## Are you carrying a fake Rs.500 Banknote in your purse/wallet?

Two days ago, Jayant Biswas, my friend, visited my house right in the middle of the afternoon. Both of us being avidly interested in all kinds of Currency and Coins, we spent the next few hours examining the differences between Rs.500 genuine Banknotes and fake ones.

On examination of genuine and fake Banknotes, one comes across certain features that are not mentioned even on the Reserve Bank of India website, which are shared here for the benefit of every Indian currency user to guard against counterfeit currency. If you have got curious enough, then please read on further:

**Common features :**

The Banknotes are signed by RBI Governor and there is a Mahatma Gandhi 'watermark' with a light and shade effect and multidirectional lines in the water-mark window in the Banknotes. Also Security threads, just right of centre and to the left of the Mahatma Gandhi portrait, are seen in the Banknotes. When you hold the Banknotes against the light, the security threads can be seen as one continuous line. (Incidentally, Banknotes, issued prior to this Mahatma Gandhi Series have plain non-readable fully embedded security threads or no security threads depending on their vintage).

This type of Security threads were introduced for the first time in Rs.1000 Banknotes in October 2000. All other denominations above Rs.5 carry readable, fully embedded windowed security threads with the inscriptions "Bharat" and "RBI".

There is a also latent image on the Face of the Banknote where a vertical band on the right side of the Mahatma Gandhi portrait the denominational value (say -"500") is shown in numerals. The latent image is visible only when the Banknote is held horizontally at eye level.

Micro-lettering is seen in the Banknotes appearing between the vertical band and the Mahatma Gandhi portrait. It contains the word "RBI" and the numerals.

Intaglio or raised Printing has been introduced in all Banknotes of Rs.20 and above. The portrait of Mahatma Gandhi, the RBI seal, the guarantee and promise clause, Ashoka Pillar (Capitol) emblem on the left bottom are all printed in intaglio on the Banknotes. An intaglio identification mark of a "Circle" for the visually challenged persons is present in all Rs.500 Banknotes of this Series. The number panels of the Banknotes are printed in fluorescent ink. The Banknotes also have optic fibres.

**See through Register :**

A small floral design is printed on the front (hollow) and back (filled up) of the Banknote in the middle of the vertical band next to the watermark has an accurate back to back registration. The design appears floral when seen against the light.

Optically variable Ink which is in the nature of a colour-shifting ink is provided for on the Banknotes in the denominations of Rs.1000 and Rs.500. This colour of Rs.1000 and Rs.500 Banknotes appears green when the Banknote is held flat but changes to blue when the Note is held at an angle.

**Printing paper :**

The quality of the Paper on which the Banknotes are printed is very difficult to differentiate unless a careful and focused approach is adopted.

Eurion Constellation circles/dots which appear in the background of the Front face and in a vertical Band on the Back of the Banknotes as a security feature to prevent scanning of Banknotes on new printers.

**Year of printing :**

This feature has been introduced in all Banknotes from 2005 onwards.

**How to identify dissimilarities between the genuine & forged Banknotes :**

While at first glance both (genuine and forged) Banknotes appear to be identical in every way, there are some differences between them as under .

1) On the Front when you look at the watermark window against the light, on the forged Banknote the Mahatma Gandhi watermark appears to have an elongated face of Mahatma Gandhi, not consistent with the Mahatma Gandhi watermark on regular/genuine issues

2) Again, on the Front, the Security Thread on the forged Banknote appears to have shifted a little to the left than the genuine Banknote which a user may not notice at first glance.

3) On the Back of the forged note there is a faint shadow of the vertical Security thread.

4) The signature of RBI Governor, the Guarantee Clause, the numeral denomination, et al seem to have overlapped on to the Security Thread of the forged Banknote which is not the case in the genuine Note

5) If you see carefully the Mahatma Gandhi's followers, at the back of the forged note, proceeding on the Dandi March, then after the woman's figure, the face of the second male follower appears distorted/ elongated, which again cannot be made out by a user at first glance.

6) Clour and printing of the Banknote bearing the year of issue of genuine note is sharper and darker than the forged one.

7) When the forged Banknote is held up against the light, the colour of the Banknote remains green and does not change to blue, suggesting that Optically Variable Ink has not been used on it.

**Scrutiny under the Ultra Violet Rays lamp :**

**Clinching evidence indicating the counterfeit Banknote:**

If both the Banknotes are placed side by side under a UV Ray Lamp the following interesting discrepancies will be visible.

1) The Security Thread on genuine Banknote the Serial number shows the vertical Security thread with lighted up "-" shaped markers, while the forged Banknote shows a completely dark Security Thread with a parallel line showing the lighted up "-" markers only. This explains why there were two parallel lines on the Back of the forged Banknote. The counterfeiters can not replicate/get their hands on the optically variable Ink, therefore, they find a via media to fool gullible users who are examining the Banknote under a 'UV Ray lamp/pen'. This also explains why two parallel dark "Security threads" may be there on the Back of the forged Banknote.

2) The next tell-tale clues are the optic fibres which look like microscopic "bacteria". Here again, the optic fibres exhibit one colour only in forged Banknote, whereas the genuine Banknote exhibits multi-coloured fibres which is the RBI's approved colour scheme. The counterfeiters can not duplicate the optic fibre colour scheme.

3) Also, you can clearly see under the UV Ray light that the forged Banknote has a slightly smaller/ cramped numeral (say -"500") as well as the words "Paanch Sau Rupiye" (in Hindi) because they try their best to avoid any overlapping on the "Security Thread" on the counterfeit Banknote. Quite a few of the regular Banknotes also have such overlaps in their designs, because of Print Shifts when the Banknotes are being printed.

**Legal Provisions against counterfeiting :**

Printing and circulation of forged Banknotes are offences under Sections 489A to 489E of the Indian Penal Code and punishable in the courts of law by fine or imprisonment or both.

**Conclusion :**

Such "clever" to "crude" forgeries in higher denomination Banknotes have again emerged in Indian circulating Rupee currency. The RBI has only added the 'Re' symbol to the "new design" Rupee Banknotes issued from 2011 onwards as a counter-measure, but have not taken any comprehensive steps to strengthen th other Security features on circulating Banknotes on an on-going basis, leading to this dangerous position. This is evident from the fact that the information provided on their website has not been upgraded / updated for a very long time to educate the users of any further steps taken by RBI to strengthen Banknote security features on an on-going basis and to prevent counterfeiting !!

The Security features in the higher denomination Banknotes i.e. Rs.500 and Rs.1000, again need to be reassessed / revisited and revamped by the Reserve Bank of India, like the US Federal Reserve has restrengthened the Security features and design on the $100 Bill to keep the counterfeiters at bay and "raise the bar" for them.

***- Rajeev Prasad,*** Pune
(M) 09421965058

**************************************************************

आपल्या सर्व समस्यांचे अचूक उत्तर,
सल्ला व मार्गदर्शन
संगणक कुंडलीद्वारे
(जन्म कुंडली, प्रश्न कुंडली)
पारंपारिक व कृष्णमूर्ती
पद्धतीने दिले जाईल !



संपर्क :
निवृत्त स्टेट बँक अधिकारी
(व्ही.आर.एस.- कॅग ब्रँच,मुंबई)
**श्री.चंद्रकांत प्र. देखणे**
**ॲस्ट्रॉलॉजर (के.पी.पद्धत)**
**मोबाईल : ९३२४८८४६६७**
एम्.ए.(इंग्लिश),बी.ए.(अर्थ); राष्ट्रभाषा पंडित, योग डिप्लोमा
(१ वर्षाचा) मुंबई सुगम संगीत गायक
ज्योतिष शास्त्री, के.पी. नक्षत्र अलंकार, नक्षत्र शिरोमणी
सर्टिफिकेट - के.पी. स्टेलर अस्टॉ. वर्कशॉप - के. हरिहरण, पुणे

या शिवाय

मुक्तांगण निर्मित
**श्री. चंद्रकांत देखणे** (भाव भक्तीगीत गायक)
सादर करीत आहे
राशीचक्र वर आधारीत प्रबोधन व मनोरंजनात्मक
एकपात्री प्रयोग
**प्रेम रंग राशींचे**

मुक्तांगण प्रस्तुत
**सुमधूर भक्ती गीतांचा कार्यक्रम**
**''भक्तीधारा''**
बजेट तुमचे - कार्यक्रम आमचा !
कुठल्याही शुभ कार्यासाठी कार्यक्रम मिळेल.

- कार्यक्रमासाठी संपर्क -
**सौ. आसावरी चंद्रकांत देखणे,** मो.- ९३२४८८४६६७, ०२०-२४४८२२८१
पुणे - विश्वकर्मा अपार्टमेंट , ३३० नारायण पेठ, मोदी गणपतीच्या मागे, पुणे-४११०३०
डोंबिवली (पू) : १२ स्टेट बँक कॉलनी, पांडुरंग वाडी, मानपाडा रोड, डोंबिवली (पू) ४२१२०१

**New Delhi High Court Writ Petition No.1931 of 2002**
**Premvati Bagga & others V/s Union of India & others**

No hearing took place on 7th November 2013. When the court listed the case for hearing on 21st November 2013 they passed the order in which the Court said that the Counsel for the petitioners prayed for and was granted four weeks time to file reply to the additional affidavit dated 30.9.2013 filed by the respondent No.3/State Bank of India. The petitioners may, if so advised, file a comprehensive reply affidavit taking into account all the additional affidavits which have been filed by the respondent No.3 pursuant to the order dated 22.8.2013 of this Court. The **next date for hearing was fixed on 9th January 2014.**

**- Secretary**

## सोलापूरकर, धुळेकर व नगरकर

परवा पुलंच्या पुण्यतिथीला त्यांचे काही जुने कार्यक्रम दूरदर्शनवरून पुन:प्रक्षेपित झाले. त्यातला ‘मुंबईकर, पुणेकर व नगरकर’ हा कार्यक्रम (पूर्वी अनेकवेळा पाहिला असूनही) यावेळी मी जरा जास्तच ‘एन्जॉय’ केला. कारण हा कार्यक्रम बघतांना माझ्या मनात बँकेत नोकरीत असतांना भेटलेली तशीच अनेक ‘प्रादेशिक मंडळी’ येत होती.

मी स्वत: (विद्वान नसूनही) पुणेकर आहे. मुंबईला सहावर्षे होतो त्यावेळी सर्वार्थाने ‘सॉफिस्टिकेटेड’ असलेले अनेक ‘मुंबईकर’ भेटले. गाजावाजा न करता पुण्यात ‘दुसरं घर’ (घरोबा नव्हे!) करणारे ‘छुपे मुंबईकर’ मात्र पुण्यात भेटले. बँकेत वेगवगेळ्या प्रशिक्षण केंद्रांवर काही ‘नागपूरकर’ (विदर्भस्त) भेटले. पण तेव्हढेच. त्यानंतर पुन्हा त्यांच्याशी संबंध आला नाही. गुळाच्या गोडीचे रांगडे ‘कोल्हापूरकर’ ही भेटले. त्याचप्रमाणे पुण्यात येऊन स्थायिक झालेले ‘शहाणे ठाणेकर’ ही पुण्यातच भेटले. पण किरकोळ!

नोकरीच्या ‘शेवटच्या पर्वा’त म्हणजे पुण्याच्या प्रादेशिक कार्यालयात असतांना मात्र ज्यांच्यापुढे अगदी मनापासून (कोपरापासून नव्हे!) ‘कर’ जोडावेत अशा अनेक सोलापूरकर, धुळेकर व नगरकर मंडळीचं मैत्र मला लाभलं, हाही आयुष्यातला एक सुखद योग होता.

खरं म्हणजे सोलापूरकरांचा संबंध बँकेत लागल्यापासूनच आला होता. मी १९६६ साली ‘पूना ब्रँच’ला लागलो (त्यावेळी ‘पूना’चं पुणे ‘झालं नव्हतं’) ‘पूनाब्रँच’चे त्यावेळचे बहुतेक अधिकारी ‘सोलापूर’हून आलेले किंबहुना सोलापूरचेच होते. त्यांचं आमचं छान जमायचं. तेव्हापासूनच मी ‘सोलापूर चादरी’ची ऊब अनुभवत होतो.

मुंबई झोनमध्ये सर्वात जास्त ‘ट्रेनी ऑफिसर्स’ देणाऱ्या सोलापूरकरांच्या हुशारीबद्दल मला पहिल्यापासूनच कुतुहुलाइतकंच कौतुकही होतं.

आमच्या ‘हिमगौरी सोसायटी’त माझे सोलापूरकर मित्र पी. आर. देशपांडे काही दिवस राहात. त्यांच्या वृद्ध वडिलांना भेटायला एकदिवस चक्क सुप्रसिद्ध क्रिकेटियर ‘पॉली उम्रीगर’ आला होता. तेव्हा आम्हाला समजलं की पी. आर.चे वडील सोलापूरच्या हरिभाई देवकरण प्रशालेत क्रीडाशिक्षक होते व त्यांनीच पॉलीला क्रिकेटमध्ये तयार केलं होतं.

सोलापूरचे चंद्रकांत (सी.पी.) कुलकर्णी चित्रपट संगीताचे चांगले जाणकार. चित्रपट संगीताच्या अनेक कार्यक्रमात ते भेटतात. स्वत:ही उत्तम कार्यक्रम सादर करतात. अशा अनेक सोलापूरकरांचं प्रेम व मैत्र मला लाभलं.

प्रादेशिक कार्यालयात माझं पोस्टिंग होत असताना सोलापूरचा लीडर सुनील (व्ही व्ही) दीक्षित ओळख नसूनही माझ्या खांद्यावर हात ठेवत आपल्या फर्ड्या इंग्रजीत मला म्हणाला, ‘‘तुझं पोस्टिंग इथचं होईल असं मी बघतोय. निश्चिंत राहा!’’ तीस वर्षाच्या नोकरीत पहिल्यांदाच एका पुढाऱ्याचा (तोहि त्यावेळी अनोळखी असलेल्या) हात खांद्यावर पडला होता. आपल्या आश्वासक शब्दांनी सुनीलने मला केव्हाच जिंकून खिशात टाकलं होतं. पुढे आमची चांगली मैत्री झाली.

प्रादेशिक कार्यालयात पुढे सोलापूरकर मंडळींचा चांगलाच जम बसला. त्यांचा व्याप वाढला, व्याप्तीही वाढली आणि त्यामुळे भल्यामोठ्या त्या ‘सोलापूरचादरी’त आमच्या काही ‘पुणेकर मित्रांचा श्वास गुदमरला होता. असो!’

अलिकडेच ‘संवाद’च्या अंकात मित्रवर्य कै. शिरूभाऊ सहस्त्रबुद्धे यांच्यावर श्रद्धांजलीपर लिहिलेला माझा लेख वाचून मला सर्वांत पहिला फोन आला तो सोलापूरचा. ज्यांच्या लेखनशैलीचा मी चाहता आहे त्या (पण अजून प्रत्यक्ष भेट न झालेल्या) सोलापूरच्या साहित्यिक शशिकांत लावणीस यांचा फोन होता तो. त्यांनी केलेलं कौतुक ऐकून माझ्या अंगावर मूठभर मांस चढलं होतं. तर अशी ही सोलापूरकर मंडळी!

‘धुळेकर मंडळी’ त्यांच्या बोलण्यात येणाऱ्या ‘येऊन राहिलाय,’ ‘चालला गेला’ अशा शब्दप्रयोगांमुळे व भाषेच्या लहेजावरून ताबडतोब ओळखून येत. माझा एक धुळेकर मित्र, ‘आम्हा धुळेकरांची दु:खं तुम्हाला काय सांगायची? आमचं धुळं म्हणजे छोटं शहर आहे का मोठं खेडं हेच कळत नाही. आचार्य अत्रे म्हणालेच होते ना- धुळ्यात धूळ सोडली तर दुसरं काय आहे?’ असं वैतागून म्हणे. पुढे बऱ्याच धुळेकरांनी (नवरंग, रागरंग, परिमल मधील) बंगले विकून पुण्यात फ्लॅट घेतले.

प्रादेशिक कार्यालयातील माझे धुळेकर वरिष्ठ अधिकारी पी. आर. बुवा यांच्याबरोबर काम करतांना एक वेगळाच आनंद होता.

निवृत्तीपूर्वी (व्ही. आर. एस.) प्रादेशिक कार्यालयातील अठ्ठावीस जणांनी एकत्र मिळून शेवटची एल. एफ. सी. घेऊन नेपाळची मोठी ट्रीप केली होती. त्यावेळी आमच्या सोबत असलेल्या श्री. व सौ. भामरे या धुळेकर आनंदी जोडप्याला कोण विसरेल?

विनोदाची व कवितेची उत्तमजाण असणारे, ‘संवाद’ मधल्या अनेक लेखातून विनोदी फटकेबाजी करणारे, मुकेशची गाणी गाणारे माझे मित्र (शंकर जयकिशन प्रेमी) वसंतराव धूपकर (मूळचे अमळनेरचे) म्हणजे धुळेकरच आहेत!

‘नगरकर मंडळी’शी माझा संबंध दोन प्रकारे आला. प्रादेशिक कार्यालयात तर ही मंडळी भेटलीच पण त्या आधी नगर जिल्ह्यात दोन ठिकाणी भेटली. ‘धूळ-गूळ-माशा व तमाशा’साठी पूर्वी प्रसिद्ध असलेले श्रीरामपूर व ‘शहाण्यांच्या पेडगाव’ शेजारचं शेडगाव या दोन शाखांमध्ये मी होतो. तिथल्या स्टाफ प्रमाणेच ‘नगरकर’ ग्राहकंशीही माझा खूप संबंध आला.

शेडगावला असताना एका ग्राहक शेतकऱ्याला मी सहज

गमतीने म्हणालो, ''माझी पहिली यत्ता नगरलाच झाली आहे. तिथल्या शाळेतच माझा पहिल्यांदा 'शिट्टी व शिवी'शी परिचय झाला.'' त्यावर तो हसून म्हणाला, ''म्हणजे बघा साहेब, आमच्या नगर जिल्ह्यातच तुमच्या पुढील आयुष्याचा पाया पक्का झाला आहे!''

श्रीरामपूर शाखेतला स्टाफ लक्षात राहाण्यासारखा होता. कितीजणांची नावं सांगू? तिथलं वातावरण खूपच छान होतं. त्या शाखेत झालेले अनेक सांस्कृतिक कार्यक्रम पुण्या-मुंबईतल्या कार्यक्रमांसारखेच 'कल्चर्ड' होत. याचं बरच श्रेय शाखाधिकारी श्री. घोलपसाहेब यांना द्यावं लागेल!

एकूणच नगरकर मंडळींना साहित्यात आणि संगीतात रुची आहे. नगरमधील 'मुळे' आडनावाचे पाचजण माझ्या ओळखीचे आहेत. त्यातला एक आहे सुनीत, नगरच्या सोसायटी हायस्कूलमधील इंग्रजी शिकवणाऱ्या मुळे मास्तरांनी 'सॉनेट(सुनीत)' या त्यांच्या आवडत्या काव्यप्रकारावरून आपल्या 'या' मुलाचं नाव त्यांनी 'सुनीत' ठेवलं. जुन्या पिढीतील शिक्षकाची रसिकता बघा!

आणखी एक व्ही. जी. (वि.ग.)मुळे यांना वाचनाचं आणि त्यावर बोलण्याचंही प्रचंड वेड. साहित्य व संगीतावर गप्पा मारणारा रसिक माणूस!

शेडगाव शाखेतील काही कोर्टकेसेससाठी नगरच्या कोर्टात बऱ्याच वेळा जावे लागे. तिथे बँकेच्या वकिलाला मी एकदा छेडलं, 'इतर सगळी गावं सुधारली तसं तुमचं नगर अजिबात सुधारलं नाही.' त्यावर तो 'असली' नगरकर विनोदानं मला म्हणाला, 'आमचं नगर शहर आम्ही वर्षानुवर्ष आहे तस्सं मेन्टेन केलंय.' इतिहासातला अनेक वर्षे इथं मुक्काम केलेला औरंगजेब बादशहा जरी प्रत्यक्ष इथे अवतरला तरी नगरचे सारे गल्लीबोळ तो ओळखू शकेल!

मला प्रत्येक वाढदिवसाला आठवणीने फोनवर शुभेच्छा देणारा माझा जवळचा मित्र विलास निंबोळकर हा नगरचाच! माझ्या एका पुस्तकाला पाथर्डीचा (जि. नगर) 'साहित्य पुरस्कार' मिळाल्यावर विलास म्हणाला, 'बघ आमच्या जिल्ह्याला तुझी कदर आहे!' तर अशी ही नगरकर मंडळी.

या नगरकरांच्या बोलण्यातला 'कुटाणा' हा शब्द मला फार आवडायचा कितीतरी वेळा मी तो शब्द वापरायचो!

कविवर्य गदिमाडगूळकरांनी म्हटल्याप्रमाणे 'जो आला तो रमला' असं आमचं पुणे शहर एका वेगळया अर्थाने 'चटक'दार आहे. इथे एकदा जो आला आणि त्याला का एकदा या पुण्याची 'चटक' लागली तो काही पुन्हा आपल्या गावाला जात नाही.

'पुणेकर आणि पुणेरी पाहुणचार' यांची आयुष्यभर छान फिरकी घेत घेत दस्तुरखुद्द पुल देशपांडे आयुष्याच्या संध्याकाळी स्वत:च पुणेकर झाले. तसाच काहीसा प्रकार या सोलापूरकर, धुळेकर आणि नगरकर मंडळींचा झाला आहे. यातील बहुतेकजण आयुष्याच्या 'माध्यान्ही'च पुण्यात स्थानिक झाले. त्यांच्या मुलांचे शिक्षण इतकंच काय पण मुलींची लग्नही इथंच झाली.

सुरूवातीला पुण्यात आल्यावर 'पुणेकरांना' नाव ठेवत, चिमटे काढत ही सारी मंडळी स्वत:च कधी 'पुणेकर' झाली हे त्यांचं त्यांनाच समजलं नाही. (आता मात्र सारे पुण्याचं भरभरून कौतुक करतात!)

या मंडळींच्या पुढच्या 'तेज व तडफदार' पिढीने हे चित्र आणखीनच बदलून टाकलंय. या पिढीतील बरेचजण अमेरिकेत 'टेन्युअर' किंवा 'ग्रीनकार्ड' मिळवून तिथंच स्थायिक झाले आहेत. त्यांची पालकमंडळी मुलांनीच पाठवलेल्या येण्याजाण्याच्या खर्चाने सहज वा कारणपरत्वे (म्हणजे मुली-सुनांची बाळंतपणे व नंतरचं नातवंडांचं बेबी सिटींग करायला) बऱ्याचवेळा अमेरिकावारी करत असतात. (अमेरिकेत 'पुणेकर' म्हणूनच मिरवतात!) त्यामुळे आताशा ही पालकमंडळी अधूनमधून भारतात असतात.

निवृत्तीनंतर या मंडळींच्या भेटीगाठी कमी झाल्या. पण आमच्या मैत्रीच्या गाठी पक्क्या आहेत. मधूनच कुणी भेटलं की भरपूर गप्पा होतात. जुन्या आठवणींना उजाळा मिळतो. तेवढ्यानंही बरं वाटतं!

- श्री. मधू पोतदार, पुणे

०७८/१३ भ्रमणध्वनी - ०२०-२५४२०४५६

## प्रतिसाद

'संवाद'चा ऑक्टोबर २०१३ चा दिवाळी अंक संपादकीयपासून शेवटच्या काय राहिले' या कवितेपर्यंत एकाच बैठकीत वाचून काढला.

श्री. प्रभाकर गुपचूप यांची 'घुसमट'ही लघुकथा मनाला भावते व चटका लावून जाते. कथेतील माधवरावांच्या मुलाच्या मृत्यूने त्यांच्या मनाची झालेली तगमग 'घुसमट' श्री. गुपचूप यांनी फारच प्रभावीपणे व परिणामकारकरित्या मांडली आहे. तसेच 'माणसं भूतकाळातील चांगल्या आठवणी विसरून कटू आठवणींचाच जास्त विचार करतात आणि वर्तमानातल्या आनंदाला पारखी होतात' हा कथेतील संदेश बोधकारक, तसाच लक्षात ठेवण्यासारखा आहे. 'घुसमट' ही लघुकथा सर्वच सभासदांना आवडेल अशीच आहे. श्री. शिंगवेकराचा 'कृतार्थ जीवनाचे रहस्य,' आणि श्री. वसंत धुपकर यांचा 'नवजीवन व नवे बंधन' हे दोन्हीही लेख चांगले, मनन करण्यासारखे आहेत. तसेच श्री. वि. वि. देशपांडे व तुळजापूरकर यांच्या कवितासुद्धा मनाला चटका लावून जातात.

'संवाद'ला शुभेच्छा

- श्री. द. अ. कुलकर्णी, पुणे

श्री. प्रभाकर गुपचूप यांची 'घुसमट' ही लघुकथा खूपच आवडल्याची प्रतिक्रिया खालील सभासदांनी फोनवरून कळविली.

श्रीयुत. बी.जी. दांडेकर (ठाणे) श्री. व्ही.जी. कोतवाल (पुणे) श्री. आपटे (कल्याण) श्री. पुरोहित (पुणे) श्री. काळे (पुणे) सौ. चारूलता सावे (दहिसर)

अनुभव

# मन शुद्ध तुझं गोष्ट आहे पृथ्वीमोलाची

हकीकत साधारणत: १९७२-७३ सालची म्हणजे जवळपास ४० वर्षांपूर्वीची आहे. आम्ही नागपूरचे पाच जण एक महिन्याच्या अंतरात चंद्रपूरला बँकेत लागलो. त्याच दरम्यान आमचा एक मित्र एटापल्ली येथे व्हेटरनरी डॉक्टर म्हणून रूजू झाला होता. एटापल्ली हे ठिकाण चंद्रपूरपासून काही अंतरावर असून दिवसातल्या दोन थेट बसेस चुकल्या तर आलापल्लीहून पुढे सायकल किंवा फॉरेस्ट कॉन्ट्रॅक्टरच्या ट्रक्सशिवाय पर्याय नव्हता. एटापल्ली चहूबाजूने घनदाट जंगलाने वेढलेले असूनही पंचायत समिती, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि बऱ्यापैकी बाजारपेठ असल्याने बाहेरून आलेले चाकरमानी आणि स्थानिक आदिवासींमुळे गजबजलेले असायचे.

नागपूरसारख्या शहरी भागातून आलेलो असल्याने जंगल आणि आदिवासी जीवनाबद्दल कुतूहल होतेच. त्यात व्यापारी-दलाल आदिवासींकडून मिठाच्या बदल्यात चारोळी, गोंद घेतात. तेंदूपत्ता वेचणाऱ्या आदिवासींचे आर्थिक-लैंगिक शोषण विपुल प्रमाणात होत असल्याने फॉरेस्ट कॉन्ट्रॅक्टर, भ्रष्ट शासकीय कर्मचारी यांच्याविरुद्ध नक्षलवादी शस्त्राच्या बळावर आदिवासींना न्याय मिळवून देतात. दोषींना हात-पाय तोडून किंवा अगदी जीवे मारून धडा शिकवतात. अशा प्रकारचे खरे-खोटे किस्से ऐकायला मिळत.

हे जवळून पण सुरक्षित अंतरावरून बघण्याच्या हेतूने जोडून आलेल्या दोन दिवसांच्या सुट्ट्यांमध्ये आम्ही एटापल्लीचा दौरा आखला. आमच्या मित्रानेसुद्धा एटापल्लीच्या त्याच्या घराऐवजी जवळच्या एका पाड्यावर आमची राहण्याची सोय केली.

जवळपास सर्व दैनंदिन व्यवहार उघड्यावर करताना आम्ही संकोचत होतो. मात्र पाड्यावरील स्त्री-पुरुष न लाजता-बुजता नि:संकोच वावरत होते. आमचे बोलणे थोडे बहुत समजणाऱ्या चार-दोन जणांशी बोलत होतो, जमेल तेवढी माहिती घेत होतो. इतर आपल्या गोंड-माडीया भाषेत संवाद साधण्याचा प्रयास करीत आणि आम्ही समजल्यासारखे करीत वेळ मारून नेत होतो. आमचे कुतूहल ठराविक प्रश्नांभोवती आणि तेवढ्यापुरतेच मर्यादीत होते. साप-विंचू-काट्याची भीती वाटत नाही का? नक्षलवादी तुम्हाला त्रास देतात का? रात्रीचा वाघ किंवा इतर रानटी श्वापदे आल्यास कसा प्रतिकार करता? खुल्या आकाशाखाली आणि खरे तर वरील प्रश्नांमधील शक्यतांच्या भीतीमुळे झोप येणे शक्य नव्हते. त्यामुळे जीवनातील कठोर सत्याचे अनेक दारुण पैलू उकलले गेले.

धान्य मुख्यत: तांदूळ संपले म्हणजे वेगवेगळा झाडपाला आणि सापडतील ते पक्षी-प्राणी अगदी कावळा आणि उंदीरसुद्धा नसुते उकडून-भाजून बिन मीठाचे खावे लागतात. झाडावरच्या लाल मुंग्यांची चटणी चविष्ट असते. उपवर मुली आपला जोडीदार स्वत:च निवडतात. पुढे न पटल्यास दुसरा घरठाव आपल्या मर्जीने करू शकतात. भूत-भूताटकीमुळे रोगराई-आजारपण येते. वैदू-मांत्रिकच ते दूर करू शकतात. आधुनिक इलाज औषधोपचार थोतांड असून लुबाडण्याचे कारस्थान आहे. शिक्षणाचा आग्रह व्यर्थ असून त्यामुळे देव-देवता कोपतात. नक्षलवादी भली माणसे असून अल्पशा मदतीच्या बदल्यात ते न्याय मिळवून देतात, जंगल कामाची वाढीव मजूरी मिळवून देतात. नक्षलवादी अण्णांना कधीमधी जेवण, निवारा आणि पोलिसांपासून त्यांचा ठावठिकाणा लपविणे ही सर्वात मोठी मदत असते. एखादा फितूर खबऱ्या सरकारच्या भूलथापांना बळी पडून त्यांच्या विरोधात गेला तर साक्षी-पुराव्याशिवाय यमसदनी रवानगी असा थेट न्याय.

ह्या प्रकारच्या गप्पांमध्ये त्या पाडा प्रमुखाने एका हिरकणीची कथा सांगितली. एका जिगरबाज युवतीची संघर्षगाथा आणि सच्ची प्रेमकहाणी थोडक्यात अशी :-

हिरा नावाप्रमाणेच वज्रकठोर. बोलणे, चालणे एकदम बेमुर्वत, निर्भिड. तारुण्यात जेमतेम पदार्पण करण्याच्या वयात कुमारी माता होण्याची वेळ आली. त्याच दरम्यान प्रियकराला नक्षलवाद्यांच्या बंदुकीची शिकार व्हावे लागले. रात्रीच्या अंधारात पोलिसांचा खबऱ्या समजला जाऊन गैरसमजुतीने टिपला गेला. उजाडल्यावर गावकऱ्यांच्या आणि अण्णा लोकांच्या ध्यानात ही घोडचूक आल्यानंतर त्यांनी हिराची माफी तर मागितलीच पण सर्व प्रकारची मदत करण्याची तयारीसुद्धा दाखवली. हिरावर आभाळ कोसळले होते. तिच्या भावी जीवनाच्या सुख-स्वप्नांचे धिंडवडे उडाले होते. तिच्याशी घरठाव करण्यास अनेक तरुण राजी होते. हिरा आपल्या प्रेमाशी प्रामाणिक होती. त्यामुळे आपल्या इराद्यावर ठाम होती. ती आपल्या बाळाला जन्म देणार होती. सासरी एखाद्या परिणीत सुनेप्रमाणे राहून त्या प्रीती अंकुरास वाढवणार होती.

आम्ही तिला दुसऱ्या दिवशी बघितलीसुद्धा. एकदम बिनधास्त आणि ठामपणे वावरत होती. त्या काळात त्या समाजात एवढ्या धाडसी निर्णयामुळे किती सामाजिक रोष सहन करावा लागला असेल ह्याची कल्पना न केलेली बरी.

त्या वयात कुणाला देण्याएवढे ज्ञान नव्हते, अनुभवही नव्हता आणि खरेतर आपण कुणाचे काही देणे लागतो ह्याचे भानही नव्हते. मात्र ह्या सहलीने एक नवे विश्वरुपदर्शन घडविले. आपल्या जगातल्या रुढी-प्रथा-परंपरा-मान्यता ह्यांचा प्रभाव नसणारे ते जग होते. त्यांचे एकूणच जीवन निर्झराप्रमाणे निर्मळ आणि पवित्र होते.

आपल्यातला बेगडी दांभिकपणा आजही आपला सल टिकवून आहे.

६१/१३

**- अशोक वि. जोशी,** नागपूर
मोबा. - ९८६००६०२१२

## नववर्ष!

आपणासर्वांना नववर्षाच्या हार्दिक शुभकामना. ३१ डिसेंबरला रात्रीचे बारा वाजले की नववर्ष सुरू झालं असं समजलं जातं. हल्ली रात्री बारा वाजतांच हे नववर्ष 'उजाडतं' ही प्रथा खरं तर तीस पस्तीस वर्षांपूर्वीच कदाचित त्याच्याही आधी सुरू झाली आहे. पूर्वी हा सोहळा फक्त पंचतारांकित हॉटेलांमध्ये पार पाडला जायचा. उद्योगपती, चित्रपट व्यवसायाशी संबंधित लोक, समाजातील प्रतिष्ठित लब्ध प्रतिष्ठित, श्रीमंत लोक तिथे हजर असायचे. त्यांच्यासाठी भरपूर पैसे भरून टेबल आरक्षित करायचे.

सामान्यांच्या घरी नवीन वर्षाची पहाट व्हावयाची तेव्हा घरोघरी जरा लवकर उठलं जायचं. तसं ही चाकरमानी मंडळींची रोजचीच पहाटे लवकर उठायची सवय अजूनही आहे. अशा त्या रोजच्याच सकाळी जरा वेगळं म्हणजे उठल्याउठल्या घरातल्या मंडळींना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या जायच्या व ऑफीसात पोहोचल्यावर सहकर्मचाऱ्यांनाही शुभेच्छा देऊन ऑफीसच्या दिवसाची सुरूवात व्हावयाची. अजूनही ही प्रथा चालू आहे.

तसं पाहिलं तर काय नवीन असतं हो ह्या दिवशी? तोच सूर्य नेहेमीसारखाच उगवतो. तेच नीळंशार आकाश असतं. त्यात तरंगणारे तुरळक पांढऱ्या छोट्या ढगांचे पुंजके तेच तसेच असतात. तेच पक्षी तशीच किलबिल करतात. सुंदर फुलं रोजच्यासारखीच सुंदर रंगांची, मस्त सुगंधाची उधळण करीत असतात. तीच इंद्रधनुषी फुलपाखरं नि काळे भ्रमर प्रत्येक फुलाला भेटून रोजचीच शुभेच्छांची देवाणघेवाण करीत असतात. वातावरणात रोजच्या सकाळचीच प्रसन्नता असते. सूर्याची किरणं सकाळी नेहेमीसारखीच उबदार वाटतात. आपणही तेच असतो. आपली कामही तीच असतात. काहीही नवीन नसतं. जुनं वर्ष संपलं, दुसरं वर्ष सुरू झालं, ही मानवानीच आखलेली अदृष्य सीमारेषा ओलांडून प्रत्येकजण ह्या 'दुसऱ्या' वर्षात पदार्पण करतो. काल शुभंकरोतीसाठी जोडलेले आपले हात सकाळी देवाला प्रार्थना करतात.

पण नावीन्य असतं ते प्रत्येकाच्या नजरेत. त्या नजरेनं आपण निसर्गाकडे बघतो. रोजचाच निसर्ग खूपच जास्त सुंदर भासतो. नावीन्य असतं ते प्रत्येकाच्या मनात. ही मनामधली भावना महत्वाची. ती आपण परिधान केलेल्या नवीन कपड्यांमधून व्यक्त होते. नवीन कपड्यांवर सुंदरशा 'परफ्युम'चा फवारा आठवणीनं मारला जातो. मनामधली प्रसन्नता नजरेत दिसते, प्रत्येकाच्या चेहऱ्यावर विलसते. त्यादिवशी नेहमीची बस, ट्रेन चुकली तर उगीचच 'नवीन वर्षाची सुरुवात खराब' झाल्याची चुटपुट मनाला लागते. तरीही आपण प्रयत्नपूर्वक ते उदास विचार मनाबाहेर ढकलून प्रसन्नतेचा मुखवटा धारण करून वावरतो. आता आपण पेन्शनर असलो तरीही भटेणाऱ्या प्रत्येक ओळखीच्या व्यक्तीला शुभेच्छा देतो. आठवून मित्र मैत्रिणींना फोनवरून शुभेच्छाचं आदानप्रदान होतं. पण हे सगळं प्रसन्नतेचा मुखवटा धारण करूनच घडतं. हे आपण नेहमीच केलं तर? रोजच नवीन वर्षाचा पहिला दिवस वाटेल आणि आपण रोजच हळू हळू खरेखुरे आनंदी राहून काम करीत राहू. माझी खात्री आहे की प्रत्येकाचं प्रत्येक काम व्यवस्थित पार पडेल कारण मन आनंदी असेल.

त्यासाठी मग नववर्षाची वाट बघण्याची गरज राहणार नाही. ह्या नवीन वर्षाचं महत्त्व गुढीपाडवा, दिवाळीचा पाडवा ह्या दिवसांनासुद्धा प्राप्त झालेलं असतं. तेव्हाही आपण प्रसन्न राहून शुभेच्छा देत-घेत असतो. तीच कथा प्रत्येक सणाची, संक्रांतीची, दसरा, अक्षय्यतृतीया ह्या साडेतीन मुहूर्तांमध्ये गणल्या जाणाऱ्या दिवसांची आणि घरांतल्या प्रत्येक व्यक्तीच्या वाढदिवसाची व विवाहितांच्या लग्नाच्या वाढदिवसाची सुद्धा. तसंच दुसऱ्या कुणाच्याही किंवा जवळच्या नात्यातल्या लग्नसमारंभामधील आपल्या उपस्थितीचीही कथा हीच असते नाही?

पण ह्या प्रत्येक वेळेला आपण हे प्रसन्नतेचे मुखवटे परिधान करतो. खरं तर मागच्या वर्षामधल्या व्यसनांसकट व्यसनी मंडळी हे दिवस साजरे करतात व व्यसनांसकट, चुकीच्या आचरणासह, चुकीचे विचार बरोबर घेऊनच नवीन वर्षातही आपण आपल्या समग्र गुणदोषांसकट नवीन वर्षात येतो. जेव्हा आपण स्वत:ला आमूलाग्र बदलण्याची गरज असेल तर तसं बदलून, मागच्या वर्षातल्या चुका मागे सोडून व्यसनांमधून मुक्त होऊन, चुकीच्या विचारांना जुन्या वर्षाच्या अंधारात गाडून टाकून नवीन वर्षाचं स्वागत करू, तेव्हाच ती खऱ्या अर्थानं नववर्षाची सुरुवात ठरेल.

*सौ. उज्वल र. ब्रह्मांडकर*
विरार.

०७७/१३

## चारोळी

नवीन जीवन जगताना
दु:ख ही नवीन मिळेल
थोड्याश्या वाटचालिनंतर
त्याच्याशी नातं जुळेल

नात्यांमध्ये गुंतायच नसतं
त्यांना, आपण गुंफायच असतं
जाळं विणणाऱ्या कोळ्यासारखं
मोकळं, मोकळं राहायचं असतं

*- अरुण भट, बदलापूर*
भ्रमणध्वनी - ९६०४३८३६०७

९१/१३

# A GOOD SAMARITAN

I was returning home one late Sunday evening, after discussing a few legal matters,with a friend of mine, about the redevlopment of my society. I entered Churchgate station, it was 9.00p.m. and it was practically deserted.

I boarded the train for Borivli, and took a window seat, the compartment was practically empty. A little later a young man in his mid twenties entered the compartment, and enquired if the train would halt at Jogeshwari, and sat opposite me, stating that he was new to Bombay. I kept my briefcase on the side, and my attention was then diverted to the train on the other platform, where a lonely old man was struggling to enter the compartment. At Churchgate station the gap between the platform and the compartment is more than 20" inches. Without thinking for a moment, I got up from my seat, went across to the other side, and helped the Gentleman to board his train, and also ensured that he had a comfortable seat. As I alighted from the compartment to return back to my train for Borivli, I realized that my train had moved, and though I tried to catch up with it, it was futile. To my horror I then realized, I had left my briefcase in the train, which contained many important documents.

I stood stunned on the platform for a few minutes, wondering what I should do next as I saw the train disappear into the oblivion. I was about to turn around and go to the Station Master's Office to report, when I saw a person running towards me waving and calling out at me, and with my briefcase safe in his hand. It was the young man who was seated opposite me in the compartment. "Sir, your briefcase, he said. Please check." No need, young man, you have done a superb service for me, and I'm much obliged. Thank You. "Sir, " the young man continued, you rushed to help the old gentleman to board the train, without any concern for yourself, or your age, this act of yours put me to shame, it should have been me, out there to help the old gentlemen. "But you did make up for your lapse" I interposed. "Your sponstaneous act of getting off the moving train to hand over my briefcase to me." As there was still time for the next train to arrive, we went to the only Stall open, had some snacks, talked for some time till our train arrived. I observed that, the young man was well mannered, polite, and friendly to talk to. He talked a lot about his family, his village, his school, and the sacrifices his parents did to educate him, and make him a responsible person in life, and now having secured a good job, vowed to make his parents life as comfortable as possible. The young man got up just before his station could arrive, I wished him the very best in all his endeavours, which he acknowledged, with a warm smile and got off the train. A beautiful quote of Henry Burton,"Pass it On" came to my mind. I quote : Have you had a kindness shown?

Pass it on;
"T was not given for the alone,"
Pass it on;
Let it travel down the years,
Let it wipe another's tears,
Till in Heaven the deed appears-
Pass it on.

-M.E.BENJAMIN. (Borivli)

75/13 Mob. : 9833813305

## छंद माझा वेगळा

आपले नागपूर येथील एक सभासद श्री. चंद्रकुमार मेहता यांनी एक आगळा वेगळा छंद जोपासला आहे. त्यांनी भारतीय चलनातील रु.१ ते रु.१,०००/- सहा आकडी नंबरच्या ज्यामध्ये सुरवातीला ७८६ नंबर किंवा शेवटचा ७८६ नंबर अशा नोटा जमवल्या आहेत.

७८६ हा आकडा आपले मुस्लिम बंधु पवित्र मानतात कारण कुराणात असलेल्या अत्यंत प्रार्थनीय अशा ''आयत'' (A verse from Holy Quran) कांही, ७ कांही ८ व कांही ६ अशा आहेत व या सर्व ३० खंडात विभागलेल्या आहेत.

सर्व संग्रहातील नोटांची किंमत रु.२०९७७/- इतकी आहे. त्यांनी केलेल्या या संग्रहाची दखल Indian Records ने घेतली आहे. श्री. मेहता यांना Record Holder म्हणून सन्मान ही दिला आहे.

ह्या व्यतिरीक्त त्यांनी श्री. गणेशाच्या विविध मुद्रा असलेल्या २००० चित्रांचा संग्रह विविध ब्रॅण्ड असलेल्या आगपेट्यांची कव्हर, टपाल तिकीटे यांचाही संग्रह त्यांचेजवळ आहे त्यांच्या ह्या छंदाला नागपूर भागातील नियतकालिकांनी भरपूर प्रसिद्धी देऊन कौतुक केले आहे त्याबद्दल श्री मेहेता यांचे असोसिएशन तर्फे हार्दिक अभिनंदन.

- वसंत धुपकर

भ्रमणध्वनी - ०२०-२०२५५४०८

## रिडेव्हलपमेंट

झाडांनो, डुलून घ्या, फुलांनो हसून घ्या
फळांनो, मधुरवुन घ्या, न्हाऊमाखू घालणारे हात
लवकरच आता जाणारेत....... ॥१॥

धुळीचे भपकारे फक्त, वारंवार इथे उठणारेत
इमारतीवर बसणारे घाव,
जीव तुमचे गुदमरवणारेत...॥२॥

काही वर्षांनंतर परत, तुम्ही थकलेले असाल
किंवा नसालही कदाचित, आमच्यासारखेच ! ॥३॥

असतील तरुण हात, खुशीत पार्किंग करीत
ठेवीत पाय लिफ्टवर, टॉवरमधून त्यांची नजर
पडणार कशी तुमच्यावर.... ॥४॥

नजरेने आज गोंजारू द्या, भरभरून तुम्हाला पाहू द्या
भरभरून तुम्हाला पाहू द्या
आताच भरघोस फुलून घ्या
हसून, डोलून, झुलून घ्या
अन् फळफळावून जा ॥५॥
झाडांनो, फुलांनो, फळांनो, बायबाय हा स्वीकारून घ्या!

६९/१३ - **कल्पना सुभाष कोठारे, सांताक्रूझ**

## वयं मोठं खोटं

ऐंशी वर्षाचे आजोबा अन् अठ्ठ्याहत्तर वर्षाची आजी-आजही दोघं अगदी ठणठणीत अन् उत्साही आहेत - काल मॉलमध्ये ते दोघं भेटले - दोघंही एकमेकांना विचारून ''हे घ्यायचं का? ते घ्यायचं का? विचारत मॉल मध्ये हिंडत होते. आजोबा सारखं ''डार्लिंग हे बघ - डार्लिंग हे घेऊ या? त्यांचं सारखं डार्लिंग डार्लिंग ऐकून मला खूप गंमत वाटली. मी आजींना म्हटलं - ''आजी ह्या वयात सुद्धा तुम्हाला ते डार्लिंग म्हणताहेत - खूप मजा वाटते तुमचा रोमांटिकपणा बघून.''

''छे ग! तसलं काही नाही. हल्ली हल्ली वयोमानानुसार ते विसराळू झालेत! माझं नाव त्यांना आठवलं नाही की डार्लिंग डार्लिंग म्हणतात मला.'' आजी डोळे मिचकावीत मिश्किलपणे म्हणाल्या.

०६४/१३ - **मधु रानडे** नाशिक
भ्रमणध्वनी - ९८२२१४८०४

## आई

कुशीत घेऊन बाळाला दूध पाजते आई
ज्ञानामृत पाजिते जगाला वंद्य गुरूमाऊली ॥धु॥
बाळ पडता थोडा रडता घाबरीघुबरी होते
ताप येता मलूल दिसता घाली देवाला साकडे
बाळाची प्रगती पाहून आनंदीत होते आई ॥१॥

दुर्योधनाच्या दुष्कर्माने खंतावली गांधारी
शिवरायांच्या पराक्रमाने सुखावली जिजाई
यशोदा देवकीच्या मायेमध्ये चिंब भिजले श्रीहरी ॥२॥

देश संकटी पडला पाहून होई रणसज्जता
मायभूमीच्या रक्षणासाठी पुत्र पाठवी माता
'परमवीर' चक्र घेतसे शहिदाची आई ॥३॥

शेतामध्ये बळीराजा पिकवतो धनधान्य
जगताला जगण्यासाठी तोच पुरवितो अन्न
स्वत: तापते घास भरवते प्रेमळ काळी आई ॥४॥

जगताच्या कल्याणास्तव संत जगी पातले
ज्ञानेश्वर आणि भावंडांनी दु:ख किती भोगले
आळंदीत अमृतपाजी जगताला माऊली ॥५॥

जन्मदात्री, मायभूमी संत जगाची माऊली
देवीरूप काली, भवानी, जगदंबा अंबाबाई
गोपाळसुत वंदितो विविध रूपातील आई ॥६॥

१६/१३ - **गजानन अराणके**, पुणे
**मो.- ९८८१०६१४१३**

## खोटं कधी बोलू नये

''मला बोलावलं सर?''
''हा हा - या रानडे या! सकाळपासून तुम्हाला विचारायचं म्हणत होतो...''
''विचारा ना सर..!''
''तुमचा भुता खेतांवर... पुनर्जन्मावर विश्वास आहे?''
''तसं म्हटलं तर मला त्याचा काही अनुभव नाही... पण... तसं काही असेलही! सर... तुम्हाला काही अनुभव?''
''तुम्ही ज्या मित्राच्या मौतीला जायचंय म्हणून काल ऑफिसला दांडी मारलीत.. तो तुमचा मित्र तुमची चौकशी करायला काल आला होता माझ्याकडे.''

०६४/१३ - **मधु रानडे** नाशिक
भ्रमणध्वनी - ९८२२१४८०४

**Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008**
**SSPO Pune under Postal Concession Register No. PNCW/M-144/2011-2013 Dated 10.12.2010**
**Permission to Post without Prepayment No.: WPP-217 at Market Yard P.S.O. on 25th of each Month and published on 25th of the month**

## कविता कविता म्हणजे काय असते...

कविता कविता म्हणजे काय असते
हृदयातून फुटलेले शब्दांचे कारंजे असते !
विचारांनी पसरलेले लोभसवाणे इंद्रधनु असते!
शब्दांच्या रांगोळीत सजलेले अंगण असते!
आईने जोजवताना म्हटलेले अंगाईगीत असते!
नवजात शिशूचे मुठीत दडलेले गुपित असते!
प्रेयसीच्या गालावर फुललेले गुलाबी फूल असते!
प्रियकराच्या स्पर्शाने नकळत आलेली शिरशिरी असते!
एकमेकांवरच्या आपल्या प्रेमाचा आविष्कार असते!

०८४/१३ – **विजयकुमार व्ही. देशपांडे**,सोलापूर
मो. – ९०११६६७१२७

## देवा मला मुक्त बनव!

देवा मला मुक्त बनव
मातीच्या कणाकणातून
माझंच अंग अंग फुलव...
देवा मला मुक्त बनव
माळावरच्या फुला फुलातून
माझेच रंग रंग खुलव...
देवा मला मुक्त बनव
ताडमाड माडांवरून
वारा म्हणून मलाच झुलव...
देवा मला मुक्त बनव
ओथंबल्या गर्द ढगातून
मलाच थेंब थेंब ढळव..
देवा मला मुक्त बनव
किनाऱ्यावरच्या वाळूतून
लाटांशी मलाच खेळव..
देवा मला मुक्त बनव
जवळ दूर असणाऱ्या
तुझ्यातच मला मिळव..

०८६/१३ – **प्रकाशचित्रे**,कोल्हापूर
मो. – ९९२२६२६२००

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.